# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 June 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जून २०२५ दुपारी १.०० वा.**

****

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं भीषण विमान अपघात झालेल्या ठिकाणी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत पंतप्रधानांनी परिस्थितीचा आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर रुग्णालयात जाऊन जखमींची चौकशी केली. विमान दुर्घटनेचे विध्वंसाचे दृश्य दुःखद आहे. या अकल्पनीय दुर्घटनेत ज्यांनी आपले प्रियजन गमावले त्यांच्यासोबत संवेदना कायम आहेत असं पंतप्रधान मोदी यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. ही घटना अत्यंत हृदयद्रावक असल्याचं ते म्हणाले.

****

दरम्यान, या विमान दुर्घटनेच्या तपासात अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचे तपास पथक चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

****

अहमदाबादमधील विमान अपघातात मुंबईतील तीन क्रू मेंबर्सचाही मृत्यू झाला आहे. बदलापूर इथले दीपक पाठक, डोंबिवली इथली रोशनी सिंघारे आणि पनवेल इथली मैथिली पाटील हे विमान एआय-१७१ चे क्रू मेंबर्स होते. दरम्यान, मुंबईतील महाराष्ट्र सचिवालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागानं पीडितांच्या नातेवाईकांसाठी मदत कक्ष स्थापन केले आहेत. याशिवाय, ०२२-२२ ०२ ७९ ९०, ०२२-२२ ७९ ४२ २९ आणि १० ७० तसंच ९३ २१ ५८ ७१ ४३ हे हेल्पलाइन क्रमांक देखील जारी करण्यात आले आहेत.

****

भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नसल्याचं राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध लेखाच्या अनुषंगाने, मतदारयादीत नावांची भर घालणे किंवा वगळणे, याबाबत करण्यात आलेल्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी हा खुलासा केला. राज्यातल्या मतदार संख्येच्या वाढीबाबत लेखातील माहिती दिशाभूल करणारी असल्याचं त्यांनी सांगितलं. मतदार नोंदणी प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक असून, यामध्ये सर्व राष्ट्रीय पक्षांशी सातत्यानं समन्वय साधला जात असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी “छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेचं” आज पहाटे कोल्हापूर इथं आगमन झालं. आज याठिकाणी पर्यटक श्री अंबाबाई मंदिर आणि पन्हाळा किल्ल्याला ते भेट देतील. रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने नऊ तारखेला मुंबई इथून ही गाडी पर्यटनासाठी रवाना झाली होती.

****

बांधकाम पूर्ण झालेली रुग्णालये कार्यान्वित करून लवकरात लवकर जनतेच्या सेवेत आणावीत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. काल मुंबईत आरोग्य भवन इथं झालेल्या बैठकीत ते बोलत होते. स्थानिक प्रशासनाने घरोघरी जाऊन आरोग्य तसंच स्वच्छतेबाबत जनजागृती करावी, असे निर्देशही आबिटकर यांनी यावेळी दिले.

****

मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बार्टीच्या धर्तीवर ‘आर्टी’ संस्थेचे सक्षमीकरण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. काल मातंग समाजाच्या मागण्यासंदर्भात फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं. मातंग समाजाच्या सघटनांनी आपल्या मागण्या लेखी स्वरूपात समितीकडे सादर कराव्यात. येणाऱ्या जातनिहाय जनगणनेमध्ये लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरणात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

****

ग्रामीण विकासात शासन आणि ग्रामस्थांमधील दुवा म्हणून सरपंच काम करतात ग्रामविकासातील त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असं प्रतिपादन रोजगार हमी आणि फलोत्पादन विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित सरपंच परिषदेत काल ते बोलत होते.

ग्रामीण विकासामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शेती, फळ पिकाची लागवड आणि पशुपालनाचा जोड व्यवसायास केंद्र शासन आणि राज्य शासन भरीव प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहे, या निधीचा वापर शेतकऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक विकासासाठी तर सरपंचांनी गावकऱ्यांच्या विकासासाठी समन्वयक म्हणून काम करावं असं त्यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आज योग शिबिर घेण्यात आलं. शहरातील विद्या प्रसारणी शाळेच्या सभागृहात समर्थ प्रभात योग समिती आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमानं हे शिबिर घेण्यात आलं. यावेळी योग प्रशिक्षकांनी विविध आसनांची प्रात्यक्षिकं सादर केली त्यानंतर योग जनजागरण फेरी काढण्यात आली.

****

आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघ – आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेत भारतीय नेमबाज सिफ्त कौर सामरानं कांस्य पदक पटकावलं. २३ वर्षीय सिफ्तनं आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत ४५३ पूर्णांक १ गुण मिळवत ही कामगिरी केली.

****